# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** समाज विकास विभागांतर्गत स्व.अनुसयाबाई काळे स्मृती महिला
**{समाज विकास विभाग}** समुपदेशन केंद्र (कौटुंबिक समस्या निवारण करण्याकरिता) स्थायी समिती ठराव क्र. 80, दि. 24/08/2021 नुसार झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत सुरु असलेल्या महिला समुपदेशन केंद्र संचालन करणाऱ्या स्वयंसेवी सस्थांची मुदत दि. 19/07/2022 रोजी संपुष्ठात येत आहे. तत्पूर्वी महिला समुपदेशन केंद्र संचालन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची नव्याने निवड ई- निविदा (EOI) प्रक्रियेद्वारे करण्याकरिता स्वयंसेवी संस्थांची निवडीचे निकष, अटी व शर्ती स्थायी समिती ठराव क्र. 106, दि. 21/07/2017 तसेच स्थायी समिती ठराव क्र. 280, दि. 29/11/2017 मध्ये अंतर्भूत केल्यानुसार निवड प्रक्रिया करणे त्याचप्रमाणे ई-निविदेची (EOI) प्रक्रिया पूर्णत्वास होईस्तवर पुढील आदेशापर्यंत महिला समुपदेशन केंद्र संचालन करणाऱ्या स्वयंसेवी सस्थांना मुदतवाढ देण्याचे प्रश्न विचारात घेवून याकरिता येणाऱ्या एकूण वार्षिक प्राकलन राशी रु. 33,60,000/- (अक्षरी - तेहत्तीस लक्ष साठ हजार रुपये) सन २०२२-२०२३ च्या महिला व बाल कल्याणच्या पद क्र. २७४/A-२७००२४४१६०१ या पदा अंतर्गत असलेल्या प्रावधानातुन करण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्याचे व ई—निविदा प्रक्रिये अंतर्गत अंतिमरित्या पात्र झालेल्या समुपदेशन संस्थांना तिन वर्षाचे कालावधी करिता कार्यादेश तामिल करून करारनामा करण्याकरिता मान्यता प्रदान करणेबाबत.

टिप - सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

EOI निकष नस्तीत संलग्न

### स्वारस्य अभिरूची

समाज विकास विभागा मार्फत स्व. अनुसयाबाई काळे स्मृती महिला समुपदेशन केंद्र (कौटुंबिक समास्या निवारण करण्याकरिता) १० महिला समुपदेशन केंद्राची १० झोनमध्ये नियुक्त करावयाच्या संस्था करिता आवेदने मागविण्यात येत आहे. आवेदन कर्त्यांकरिता आवश्यक असणारे निकष खालीलप्रमाणे.

स्वारस्य अभिरूची व निकष (अटी व शर्ती)

१. एका संस्थे एकापेक्षा जास्त् केंद्र मंजुर करण्यात येणार नाही.
२. संस्थेची निवड प्रथम एका वर्षासाठी असेल व काम समाधानकारक असल्यास पुढे मुदतवाढ देण्याचा विचार करण्यात येईल. परंतु आयुक्त यांचे शिफारसीने मुदतवाढीचे अधिकार स्थायी समिती स राहील.
३. वर्षभर समुपदेशन केंद्राचा खर्च भागविण्याची संस्थेची आर्थिक क्षमता असावी.
४. संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.
५. नोदंणीकृत संस्था महिला व बाल विकासाच्या क्षेत्रात किमान ३ वर्ष कार्यरत असावी.
६. संस्थेस महिला व बालकांच्या समुपदेशनाचा किमान २ वर्षाचा अनुभव असावा.
७. समुपदेशकाची निवड महानगरपालिके नियुक्त स्वयंसेवी संस्था मार्फत करण्यात येईल.
८. संस्थेच्या योजना व कार्याबाबतचा मागील ३ वर्षाचा वर्षनिहाय वार्षिक अहवाल.
९. केंद्रासाठी महानगरपालिकेच्या झोनमध्ये २०० ते २५० फुट जागा व टेबल खुर्च्या, कपाट, उपलब्ध करून देण्यात येईल.
१०. दुरध्वनी खर्च, विज बिल ज्या संस्थेव्दारे केंद्र चालविण्यात येईल. त्या संस्थेस करावा लागेल.
११. समुपदेशक शक्यतो महिला असतील त्यापैकी २ एम.एस.डब्लु. व १ कायदाशाखेची पदवीधर असेल. केंद्र सुरूवातीला ८ तास चालविले जाईल व नंतर २४ तास भ्रमनध्वनीवरून संपर्क साधून गरजु महिलेला मदत देण्यासाठी कार्यरत राहील.
१२. संस्थेचा मागील तीन वर्षाचा सनदी लेखापालची स्वाक्षरी असलेला वर्षनिहाय लेखा परिक्षण अहवाल.
१३. संस्थेने समुपदेशनाचे कार्य केल्याबाबतचा कार्याचा स्वतंत्र अहवाल सांख्यिकी माहितीसह.
१४. संस्थेचे मागील तीन महिन्याचे महीना निहाय बॅक स्टेटमेंन्ट.
१५. संस्थेची घटना व नियमावली (घटनेत मिहिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे हा उद्देश असावा) ची साक्षांकित प्रत.

१६. संस्थेने वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे छायाचित्र, कागदपत्रे वत्तपत्रातील कात्रणे जोडावीत.

१७. संस्थेच्या कार्यरत पदाधिकारी व कार्यकारणीची नाव, पत्ता, व्यवसाय व दुरध्वनी क्रमांकासह यादी जोडावीत.

१८. संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्य एकमेकांचे नातेवाईक नाहीत तसेच कोणीही सदस्य शासकीय सेवेत नाही याबाबतचे हमीपत्र सोबत जोडावे.

१९. संस्थेच्या पदाधिका-याबाबत (अध्यक्ष व सचिव) उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे स्वाक्षरीचे विना दुराचार प्रमाणपत्र (चालु वर्षाचे).

२०. संस्थेच्या नावाने संस्थेबाबत जनसामान्यांच्या तक्रारी नाहीत, संस्थेबाबत गैरव्यवहाराच्या तक्रारी नाहीत. तसेच संस्थेने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नाही याबाबत जिल्हाधिका-यांचे प्रमाणपत्र (चालु वर्षाचे).

२१. नियुक्त् केलेल्या समुहाचे काम असमाधानकारक असल्यास त्यांना पुढे मुदतवाढ देता येणार नाही.

२२. समुपदेशन केंद्राचे काम योग्य पध्दतीने चालु आहे किंवा नाही याबाबतचा त्रैमासिक अहवाल समाज कल्याण अधिकारी व मा . आयुक्त मनपा यांना सादर करणे बंधनकारक राहील.

२३. केंद्रातील समुपदेशकास मासीक मानधन हे त्या संस्थेस धनादेशाव्दारे देणे बंधनकारक राहील व त्यांची माहिती प्रत्येक महिन्यास लेखा व वित्त विभागास देणे बंधनकारक राहील.

२४. क्रेंदाचा त्रैमासिक कार्यअहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई येथे पाठविणे व तशी पोचपावती विभागास जमा करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त निकषांच्या आधारे आपला सर्वकष प्रस्ताव दिनांक ………………………. ते दिनांक ……………………… या कालावधीत महानगरपालिकेच्या सांकेतीक स्थळावर संगणीकृत पध्दतीने (Online) सादर करावा.

टिप :- महानगरपालिकेच्या समाज विकास विभागात (Offline) पध्दतीने प्रस्ताव स्विकारण्यात यात येणार नाही.

# <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- ४१/मनपा/प्रशासक** **दिनांक :- २८/०७/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार समाज विकास विभागांतर्गत स्व.अनुसयाबाई काळे स्मृती महिला समुपदेशन केंद्र (कौटुंबिक समस्या निवारण करण्याकरिता) स्थायी समिती ठराव क्र. 80, दि. 24/08/2021 नुसार झोन क्र. 1 ते 10 अंतर्गत सुरु असलेल्या महिला समुपदेशन केंद्र संचालन करणाऱ्या स्वयंसेवी सस्थांची मुदत दि. 19/07/2022 रोजी संपुष्ठात येत आहे. तत्पूर्वी महिला समुपदेशन केंद्र संचालन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची नव्याने निवड ई- निविदा (EOI) प्रक्रियेद्वारे करण्याकरिता स्वयंसेवी संस्थांची निवडीचे निकष, अटी व शर्ती स्थायी समिती ठराव क्र. 106, दि. 21/07/2017 तसेच स्थायी समिती ठराव क्र. 280, दि. 29/11/2017 मध्ये अंतर्भूत केल्यानुसार निवड प्रक्रिया करणे त्याचप्रमाणे ई-निविदेची (EOI) प्रक्रिया पूर्णत्वास होईस्तवर पुढील आदेशापर्यंत महिला समुपदेशन केंद्र संचालन करणाऱ्या स्वयंसेवी सस्थांना मुदतवाढ देण्याचे प्रश्न विचारात घेवून याकरिता येणाऱ्या एकूण वार्षिक प्राकलन राशी रु. 33,60,000/- (अक्षरी - तेहत्तीस लक्ष साठ हजार रुपये) सन २०२२-२०२३ च्या महिला व बाल कल्याणच्या पद क्र. २७४/A-२७००२४४१६०१ या पदा अंतर्गत असलेल्या प्रावधानातुन करण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्याचे व ई–निविदा प्रक्रिये अंतर्गत अंतिमरित्या

पात्र झालेल्या समुपदेशन संस्थांना तिन वर्षाचे कालावधी करिता कार्यादेश तामिल करून करारनामा करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

## स्वारस्य अभिरूची

समाज विकास विभागा मार्फत स्व. अनुसयाबाई काळे स्मृती महिला समुपदेशन केंद्र (कौटुंबिक समास्या निवारण करण्याकरिता) १० महिला समुपदेशन केंद्राची १० झोनमध्ये नियुक्त करावयाच्या संस्था करिता आवेदने मागविण्यात येत आहे. आवेदन कर्त्यांकरिता आवश्यक असणारे निकष खालीलप्रमाणे.

स्वारस्य अभिरूची व निकष (अटी व शर्ती)

१. एका संस्थे एकापेक्षा जास्त् केंद्र मंजुर करण्यात येणार नाही.

२. संस्थेची निवड प्रथम एका वर्षासाठी असेल व काम समाधानकारक असल्यास पुढे मुदतवाढ देण्याचा विचार करण्यात येईल. परंतु आयुक्त यांचे शिफारसीने मुदतवाढीचे अधिकार स्थायी समिती स राहील.

३. वर्षभर समुपदेशन केंद्राचा खर्च भागविण्याची संस्थेची आर्थिक क्षमता असावी.

४. संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

५. नोदंणीकृत संस्था महिला व बाल विकासाच्या क्षेत्रात किमान ३ वर्ष कार्यरत असावी.

६. संस्थेस महिला व बालकांच्या समुपदेशनाचा किमान २ वर्षाचा अनुभव असावा.

७. समुपदेशकाची निवड महानगरपालिके नियुक्त स्वयंसेवी संस्था मार्फत करण्यात येईल.

८. संस्थेच्या योजना व कार्याबाबतचा मागील ३ वर्षाचा वर्षनिहाय वार्षिक अहवाल.

९. केंद्रासाठी महानगरपालिकेच्या झोनमध्ये २०० ते २५० फुट जागा व टेबल खुर्च्या, कपाट, उपलब्ध करून देण्यात येईल.

१०. दुरध्वनी खर्च, विज बिल ज्या संस्थेव्दारे केंद्र चालविण्यात येईल. त्या संस्थेस करावा लागेल.

११. समुपदेशक शक्यतो महिला असतील त्यापैकी २ एम.एस.डब्लु. व १ कायदाशाखेची पदवीधर असेल. केंद्र सुरूवातीला ८ तास चालविले जाईल व नंतर २४ तास भ्रमनध्वनीवरून संपर्क साधून गरजु महिलेला मदत देण्यासाठी कार्यरत राहील.

१२. संस्थेचा मागील तीन वर्षाचा सनदी लेखापालची स्वाक्षरी असलेला वर्षनिहाय लेखा परिक्षण अहवाल.

१३. संस्थेने समुपदेशनाचे कार्य केल्याबाबतचा कार्याचा स्वतंत्र अहवाल सांख्यिकी माहितीसह.

१४. संस्थेचे मागील तीन महिन्याचे महीना निहाय बॅक स्टेटमेंन्ट.

१५. संस्थेची घटना व नियमावली (घटनेत मिहिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणे हा उद्देश असावा) ची साक्षांकित प्रत.

१६. संस्थेने वेळोवेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे छायाचित्र, कागदपत्रे वत्तपत्रातील कात्रणे जोडावीत.

१७. संस्थेच्या कार्यरत पदाधिकारी व कार्यकारणीची नाव, पत्ता, व्यवसाय व दुरध्वनी क्रमांकासह यादी जोडावीत.

१८. संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्य एकमेकांचे नातेवाईक नाहीत तसेच कोणीही सदस्य शासकीय सेवेत नाही याबाबतचे हमीपत्र सोबत जोडावे.

१९. संस्थेच्या पदाधिका-याबाबत (अध्यक्ष व सचिव) उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे स्वाक्षरीचे विना दुराचार प्रमाणपत्र (चालु वर्षाचे).

२०. संस्थेच्या नावाने संस्थेबाबत जनसामान्यांच्या तक्रारी नाहीत, संस्थेबाबत गैरव्यवहाराच्या तक्रारी नाहीत. तसेच संस्थेने सार्वजनिक संपत्तीचा अपहार केलेला नाही याबाबत जिल्हाधिका-यांचे प्रमाणपत्र (चालु वर्षाचे).

२१. नियुक्त् केलेल्या समुहाचे काम असमाधानकारक असल्यास त्यांना पुढे मुदतवाढ देता येणार नाही.

२२. समुपदेशन केंद्राचे काम योग्य पध्दतीने चालु आहे किंवा नाही याबाबतचा त्रैमासिक अहवाल समाज कल्याण अधिकारी व मा . आयुक्त मनपा यांना सादर करणे बंधनकारक राहील.

२३. केंद्रातील समुपदेशकास मासीक मानधन हे त्या संस्थेस धनादेशाव्दारे देणे बंधनकारक राहील व त्यांची माहिती प्रत्येक महिन्यास लेखा व वित्त विभागास देणे बंधनकारक राहील.

२४. क्रेंदाचा त्रैमासिक कार्यअहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोग मुंबई येथे पाठविणे व तशी पोचपावती विभागास जमा करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त निकषांच्या आधारे आपला सर्वकष प्रस्ताव दिनांक ………………………. ते दिनांक ………………………. या कालावधीत महानगरपालिकेच्या सांकेतीक स्थळावर संगणीकृत पध्दतीने (Online) सादर करावा.

टिप :- महानगरपालिकेच्या समाज विकास विभागात (Offline) पध्दतीने प्रस्ताव स्विकारण्यात यात येणार नाही.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**